महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440022
दूरध्वनी क्र. 0712- 2870120/121 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

दिनांक : १९ फेब्रुवारी २०२६

# ‘महाज्योती’ येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर येथे गुरुवारी हिंदवी स्वराज्याचे सरसंस्थापक, रयतेचे राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात ‘महाज्योती’चे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनीही महाराजांना अभिवादन करून कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी मुख्य लेखा व वित्त अधिकारी मा. प्रशांत वावगे तसेच प्रकल्प संचालक मा. कुणाल शिरसाठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रबोधनात्मक मार्गदर्शन करताना मा. मिलिंद नारिंगे यांनी शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा, रयतेप्रती असलेल्या संवेदनशील बांधिलकीचा आणि न्यायनिष्ठ राज्यकारभाराचा उल्लेख केला. स्वराज्य ही केवळ सत्ता नसून ती लोककल्याणाची संकल्पना होती, असे सांगत त्यांनी उपस्थितांना महाराजांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन मा. मिलिंद नारिंगे यांनी केले. या कार्यक्रमास प्रकल्प अधिकारी धम्मा गजभिये, विकास तिळगुळ, मयूर चव्हाण, कार्यालयीन अधीक्षक शुभम वैलथरे यांच्यासह 'महाज्योती'चे सर्व अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रति,
१) मा. संपादक,प्रिंट, ईलेक्ट्रानिक, डिजीटल माध्यम
२) मा.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
३) मा.जिल्हा माहिती अधिकारी (सर्व जिल्हे)

मा. महोदय,
कृपया उपरोक्त वार्तांकनास आपल्या माध्यमात प्रसिद्धी करावे ही नम्र विनंती.

पंकज पाचारे
प्रकल्प अधिकारी
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),
महाराष्ट्र राज्य, नागपूर


PHYSICS
CHEMISTRY
PHYSICS


ISO




ISO
महाज्योती

ISO
महाज्योती




महाज्योती


महाज्योती


महाज्योती


ISO